महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
708, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे- 411030

**संपर्क क्रमांक** (०२०)२४४७८१२२ **ईमेल :** mathsdept@maa.ac.in

जा.क्र./राशैसंप्रपम/गवि/ऑलिंपियाड स्पर्धा/२०२५-२६/ **दिनांक:** १३/११/२०२५

प्रति,

1. विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व)
2. उपसंचालक, प्रादेशिकविद्याप्राधिकरण, (सर्व)
3. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
4. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई.
5. शिक्षणाधिकारी (प्राथमिक /माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
6. शिक्षण निरीक्षक, (पश्चिम, दक्षिण, उत्तर), मुंबई.
7. प्रशासन अधिकारी, म.न.पा. / न.पा.(सर्व)

विषय: शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी तालुकास्तरीय ऑलिंपियाड स्पर्धा आयोजित करताना सुधारित सर्वसाधारण सूचनांनुसार आवश्यक कार्यवाही करणेबाबत...

संदर्भ: १. मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडील पत्र दि. १०/१०/२०२५.
२. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडील पत्र दि.१७/१०/२०२५.
३. शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका.

राज्यस्तरावरून घेण्यात येणाऱ्या विविध ऑलिंपियाड स्पर्धा (मराठी, इंग्रजी, सामाजिक शास्त्र, बुद्धिमत्ता, गणित, विज्ञान) परीक्षांचे निकष यापूर्वीच पाठविण्यात आले आहेत तथापि सदर स्पर्धा परीक्षा तालुकास्तरावर आयोजित करण्याच्या अनुषंगाने सुधारित सर्वसाधारण सूचना पाठविण्यात येत आहेत. या सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

**सोबत:** तालुकास्तरीय स्पर्धा आयोजित करताना सुधारित सर्वसाधारण सूचना.

Digitally signed by
Ibrahim Pirsaheb Nadaf
Date: 26-11-2025
13:56:48

( डॉ. इब्राहीम नदाफ )
उपसंचालक (समन्वय विभाग)
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

# राज्यस्तरीय ऑलिम्पियाड स्पर्धा

## तालुकास्तरीय स्पर्धा आयोजित करताना सुधारित सर्वसाधारण सूचना

1. परीक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी असेल. प्रश्न व उत्तराचे पर्याय मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये देण्यात आले आहेत. ( मराठी ऑलिम्पियाड स्पर्धा वगळून)
2. परीक्षेतील प्रश्न वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरुपाचे असतील.
3. सर्व विषयांच्या ऑलिम्पियाड स्पर्धांसाठी प्रश्नपत्रिकेचे स्वरूप पुढीलप्रमाणे:

| विषय | एकूण प्रश्न | प्रत्येकी प्रश्नास गुण | एकूण गुण | वेळ |
|---|---|---|---|---|
| गणित, विज्ञान | ५० | २ | १०० | ९० मिनिटे |
| मराठी, इंग्रजी, सामाजिक शास्त्र, बुद्धिमत्ता | १०० | १ | १०० | ९० मिनिटे |

4. केंद्र संचालक/ गटशिक्षणाधिकारी यांनी संबंधित स्पर्धेसाठी प्राचार्य,यांचेकडून प्राप्त तपशिलानुसार परीक्षा केंद्रावर बैठक क्रमांक टाकावेत.पर्यवेक्षकांनी स्पर्धकांना उत्तर पत्रिकेवर आपले नाव व प्राप्त बैठक क्रमांक नमूद करण्यासाठी सूचना द्याव्यात.
5. स्पर्धेच्या कालावधीत स्पर्धकांना लॅपटॉप/ संगणक/ कॅल्क्युलेटर/ डिजिटल घड्याळ/ मोबाईल इत्यादी इलेक्ट्रॉनिक साधने वापरण्यास सक्त मनाई करण्यात यावी. या साधनांचा वापर करताना आढळल्यास स्पर्धकांना स्पर्धेतून बाद ठरविण्यात यावे.
6. स्पर्धकांना दिलेल्या कालावधीत परीक्षेची वेळ संपेपर्यंत परीक्षेचे दालन सोडता येणार नाही. परीक्षा दालनातून परीक्षा वेळेपूर्वी कोणाचीही उत्तर पत्रिका जमा केली जाणार नाही. परीक्षा कालावधीत कोणत्याही स्पर्धकाला परीक्षा कक्षातून बाहेर सोडता येणार नाही.(अपवादात्मक परिस्थिती वगळून)
7. उत्तर पत्रिका ओ.एम.आर.शिट स्वरुपात असेल. स्पर्धकांनी ओ.एम.आर.शिट मध्ये योग्य पर्यायाला काळ्या अथवा निळ्या बॉलपेनने गोल करून उत्तर नमूद करावे.
8. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एका पेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण मुद्दा क्रमांक १२ मधील नियमानुसार वजा केले जातील.
9. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या अधिकृत ई-मेल आयडीवर प्रश्नपत्रिका शनिवार दिनांक. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी नऊ वाजता देण्यात येईल. सदरील प्रश्नपत्रिका गोपनीयरित्या सर्व गटशिक्षणाधिकारी कार्यालयांना देण्याची जबाबदारी प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांची राहील. गटशिक्षणाधिकारी यांच्यामार्फत स्पर्धकांच्या प्रमाणात प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर.शिट स्वरुपातील उत्तरपत्रिकांची छपाई करून घेण्यात यावी. या कालावधीत गोपनीयता राखण्याची जबाबदारी प्राचार्य व गटशिक्षणाधिकारी यांची राहील.
10. **तालुकास्तरीय स्पर्धा शनिवारी दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २:०० ते ३:३० या कालावधीत सर्व जिल्ह्यामध्ये एकाच वेळी आयोजित करावी. स्पर्धेच्या कालावधीपूर्वी किमान अर्धा तास स्पर्धकांनी परीक्षा दालनात उपस्थित राहणे बंधनकारक राहील. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर (वेळ १:५० वाजता) उत्तरपत्रिका स्पर्धकांना देण्यात याव्यात. उत्तरपत्रिकांचे वाटप झाल्यानंतर परीक्षा दालनात स्पर्धकांना प्रवेश देता येणार नाही. स्पर्धकांना वेळेपूर्वी परीक्षा दालनातून सोडता येणार नाही.** स्पर्धकांनी उत्तर पत्रिका व प्रश्नपत्रिका दोन्हीही पर्यवेक्षक यांच्याकडे जमा करणे बंधनकारक राहील.
11. **केंद्र संचालक किंवा गटशिक्षणाधिकारी यांनी स्पर्धेत दिव्यांग स्पर्धक सहभागी असल्यास अशा स्पर्धकांना**

**आवश्यकतेनुसार बैठक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात यावी. दिव्यांग स्पर्धकांना कोणत्याही स्वरूपाचा वाढीव परीक्षा कालावधी दिला जाणार नाही.**

12. सदर परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करतांना स्पर्धकाच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी एक योग्य उत्तर उत्तरपत्रिकेत नमूद करावे. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी त्या प्रश्नाच्या गुणाच्या ५०% गुण (म्हणजे मुद्दा क्र. ३ मध्ये दिलेल्या तक्त्यातील विषयानुसार ०.५० किंवा १ गुण) एकूण प्राप्त गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील.
13. एका पेक्षा अधिक स्पर्धकांना समान गुण पडल्यास सर्वात कमी निगेटिव्ह मार्किंग असणाऱ्या स्पर्धकास प्रथम क्रमांक द्यावा. तरीही समान गुण प्राप्त झाल्यास सेवाजेष्ठ स्पर्धकास प्राधान्य द्यावे, सेवा कालावधी समान असल्यास वयाने जेष्ठ असणाऱ्या स्पर्धकास प्रथम घोषित करावे.
14. सर्व स्पर्धकांनी वेळेपूर्वी अर्धा तास उपस्थित राहण्याच्या सूचना केंद्र संचालक / गटशिक्षणाधिकारी यांनी स्पर्धकांना द्याव्यात.
15. गटशिक्षणाधिकारी यांनी स्पर्धा पूर्ण झाल्यानंतर त्याच दिवशी सायंकाळी पाच वाजेपर्यंत आपल्या केंद्रावर उपस्थित असणाऱ्या सर्व स्पर्धकांच्या उत्तरपत्रिका स्कॅन करून त्याचा एक फोल्डर तयार करावा व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्याकडे ई-मेल करावा. सदर कामकाजाबाबत गोपनीयता राखावी.
16. **स्पर्धकांच्या प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका गटशिक्षणाधिकारी यांनी आपल्या सुरक्षिततेत/ कस्टडीमध्ये ठेवाव्यात.**
17. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्याकडे उत्तरसूची सोमवारी दि. १ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता इमेलद्वारे पाठविण्यात येईल. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी प्राप्त उत्तरसूची तात्काळ केंद्र संचालक/ गटशिक्षणाधिकारी यांना पाठवावी. उत्तर सूचीनुसार गटशिक्षणाधिकारी यांनी सोमवारी दि. १ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी दहा ते अकरा या कालावधीत उत्तर पत्रिका तपासाव्यात व निकाल पत्रक तयार करावे. यासाठी तालुका स्तरावर मूल्यांकन समिती स्थापन करण्यात यावी. मूल्यांकन समिती मार्फत मूल्यांकन करून विभागस्तरावर पाठविण्यासाठी तालुक्यात प्रथम आलेल्या एका स्पर्धकाचे नाव (स्पर्धा प्रकारानुसार प्रत्येकी एक), संपूर्ण निकालपत्रक, प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकासह प्राचार्य, यांचेकडे दि. १ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सील बंद करून हार्ड स्वरुपात तसेच निकालाची सॉफ्ट कॉपी त्यासोबत न चुकता सादर करावी. मूल्यांकन समितीमध्ये शासकीय किंवा अनुदानित डी.एड कॉलेज मधील अध्यापकाचार्य /प्राचार्य /महाविद्यालयीन प्राध्यापक यांचा समावेश करावा.
18. सहभागी स्पर्धकांना मूल्यांकन केलेली स्वत:ची उत्तरपत्रिकेची प्रत पाहता येईल .
19. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी प्रत्येक तालुक्यातील स्पर्धानिहाय प्रथम क्रमांकाच्या विजेत्या स्पर्धकांची नावे विभाग स्तरावरील आयोजक प्रादेशिक विद्या प्राधिकरण किंवा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या ई-मेल आयडीवर तसेच परिषदेच्या सर्व संबंधित विषय विभागांच्या ई-मेल आयडीवर एकत्रितरित्या दि. 2 डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.००वाजेपर्यंत पाठवाव्यात.

दु.क्र.०२०-२४४७६९३८
Email-iqcdept@maa.ac.in

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११०३०.

जा.क्र./राशैसंप्रपम/आंगुक/शि.अधि.स्पर्धा/२०२५-२६/ दिनांक: / /२०२५

**सुधारित पत्र**

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व)
२. उपसंचालक, प्रादेशिक विद्याप्राधिकरण, (सर्व)
३. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
४. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई.
५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक /माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
६. शिक्षण निरीक्षक, (पश्चिम, दक्षिण, उत्तर), मुंबई.
७. प्रशासन अधिकारी,म.न.पा. / न.पा.(सर्व)

विषय: शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी बुद्धिमत्ता चाचणी ऑलिंपियाड स्पर्धेचे आयोजन करणेबाबत.

संदर्भ- १. मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडील पत्र दि. १०/१०/२०२५.
२. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडील पत्र दि.१७/१०/२०२५.
३.शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये,राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणा-या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शांळामधील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी, DIET मधील अधिकारी,कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षकीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृध्दिंगत करणे, त्यांच्यात समन्वय सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजीटल भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, विभाग व राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून करण्यात येत आहे. या स्पर्धाच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा एकूण ४३ विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धाचे निकष व नियमावली बाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. त्यापैकी **बुद्धिमत्ता चाचणी ऑलिंपियाड** स्पर्धा आयोजनाची जबाबदारी राज्यस्तरावर आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष, SCERT, पुणे यांच्याकडे देण्यात आलेली आहे.

**बुद्धिमत्ता चाचणी ऑलिंपियाड स्पर्धेसाठी नियमावली -**

या स्पर्धेचे आयोजन हे तालुका, विभाग व राज्य स्तरावर केले जाईल.

१. स्पर्धेसाठी नाव नोंदणीसाठी जिल्हा / राज्य यांचेकडून केंद्रप्रमुख यांना लिंक देण्यात येईल.
२. केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक केंद्रातून एका शिक्षकाचे नाव स्पर्धेसाठी लिंकवर नोंदवावे.
३. प्रत्येक स्पर्धेतील केंद्रातील किमान एक शिक्षकाचा सहभाग घेणेबाबत प्रोत्साहित करण्यात यावे.
४. सर्व स्पर्धेसाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक अधिकारी व कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केले जाईल.
५. दि. ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.
६. या स्पर्धाची तयारी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.
७.तालुकास्तरावरील प्रत्येक स्पर्धेचा विजेता विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र राहील.
८. स्पर्धेच्या नियमावली सोबत जोडलेल्या समितीच्या बैठकीचे आयोजन करून स्पर्धेविषयी माहिती द्यावी व तालुकास्तरीय स्पर्धा गटशिक्षणाधिकारी यांनी विभाग स्तर व राज्यस्तर आयोजन संबंधित जिल्हा शिक्षण प्रशिक्षण

संस्था यांनी व एससीईआरटी पुणेकडील नियोजनानुसार करण्यात यावे. याबाबत आवश्यकतेनुसार वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

९. परीक्षा घेण्यात येणाऱ्या दिवशी परीक्षा संपल्यानंतर तातडीने उपस्थित परीक्षार्थीचे OMR sheet स्कॅन करून PDF फाईल आपल्या जिल्ह्याच्या DIET कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावी.

१०. प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका दोन्ही जमा करण्यात याव्यात.

अ) तालुकास्तर :

१. परीक्षेतील प्रश्न वस्तुनिष्ठ (MCQ) स्वरुपाचे असतील.

२. एकूण १०० प्रश्न, प्रत्येकी ०१ गुण, एकूण गुण १००, वेळ ९० मिनिटे.

३. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

४. परीक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी असेल.

५. पेपर सोडविण्यासाठी निळा अथवा काळा बॉलपेन वापरावा.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी ५०% किंवा १/२ गुण वजा/कमी करण्यात येतील.

८.परीक्षेचा अभ्यासक्रम तार्किक विचार, अंकगणितीय चातुर्य, दृश्यकल्पना, स्मरणशक्ती, मानसिक व भावनिक चातुर्य या घटकांवर असेल

९.प्रथम क्रमांकावरील उमेदवारास समान गुण पडल्यास ज्या उमेदवाराचे वजा गुण कमी असतील त्यास प्रथम क्रमांक देण्यात यावा.

१० यास्तरावरील प्रथम येणारा विजेता हा विभाग स्तरासाठी पात्र राहील.

ब) विभागस्तर:

१.परीक्षेतील प्रश्न वस्तुनिष्ठ (MCQ) स्वरुपाचे असतील.

२.एकूण १०० प्रश्न, प्रत्येकी ०१ गुण, एकूण गुण १००, वेळ ९० मिनिटे.

३.सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

४.परीक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी असेल.

५.पेपर सोडविण्यासाठी निळा अथवा काळा बॉलपेन वापरावा.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी ५०% किंवा १/२ गुण वजा/कमी करण्यात येतील.

८.परीक्षेचा अभ्यासक्रम तार्किक विचार, अंकगणितीय चातुर्य, दृश्यकल्पना, स्मरणशक्ती, मानसिक व भावनिक चातुर्य या घटकांवर असेल

९.प्रथम क्रमांकावरील उमेदवारास समान गुण पडल्यास ज्या उमेदवाराचे वजा गुण कमी असतील त्यास प्रथम क्रमांक देण्यात यावा.

१० यास्तरावरील प्रथम येणारा विजेता हा विभाग स्तरासाठी पात्र राहील.

क) राज्य स्तर:

१.परीक्षेतील प्रश्न वस्तुनिष्ठ (MCQ) स्वरुपाचे असतील.

२.एकूण १०० प्रश्न, प्रत्येकी ०१ गुण, एकूण गुण १००, वेळ ९० मिनिटे.

३.सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

४ परीक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी असेल.

५. पेपर सोडविण्यासाठी निळा अथवा काळा बॉलपेन वापरावा.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी ५०% किंवा १/२ गुण वजा/कमी करण्यात येतील.

८.परीक्षेचा अभ्यासक्रम तार्किक विचार, अंकगणितीय चातुर्य, दृश्यकल्पना, स्मरणशक्ती, मानसिक व भावनिक चातुर्य या घटकांवर असेल

९.प्रथम क्रमांकावरील उमेदवारास समान गुण पडल्यास ज्या उमेदवाराचे वजा गुण कमी असतील त्यास प्रथम क्रमांक देण्यात यावा.

१० यास्तरावरील प्रथम येणारा विजेता हा विभाग स्तरासाठी पात्र राहील.

**वेळापत्रक-**

सदर स्पर्धा तालूका, विभाग व राज्यस्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे -

१. तालुकास्तरीय स्पर्धा नोव्हेंबर २०२५ (चौथा शनिवार)

२. विभागस्तर स्पर्धा डिसेंबर २०२५ (चौथा शनिवार )

३. राज्यस्तर स्पर्धा जानेवारी २०२६ (चौथा शनिवार)

या स्पर्धेसाठी स्तरनिहाय प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तरसूची (model answer sheet) **आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष**, SCERT, पुणे मार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. स्पर्धकांच्या संख्येनुसार आवश्यक प्रिंट आपल्या स्तरावर उपलब्ध करून देण्यात याव्यात.उत्तरपत्रिका तपासणी व आवश्यक सर्व कामकाज आपल्या स्तरावर विहित कालावधीत पूर्ण करावे.या सर्व कामकाजात गोपनियता असणे अत्यंत आवश्यक आहे. सदर स्पर्धेच्या आयोजनासाठी तालुका व विभाग स्तरावर सनियंत्रण समितीचे गठण करण्यात यावे.

Digitally signed by
Pradeepkumar Manohar Kudalkar
Date: 14-11-2025 12:21:10

(प्रदीपकुमार कुडाळकर)
उपसंचालक
**आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
महाराष्ट्र, पुणे

# बुद्धिमत्ता ऑलंपियाड स्पर्धा

## अभ्यासक्रमाचे स्वरूप

| अ.क्र. | घटकाचे नाव | उपघटकांची नावे | घटकासाठी निश्चित करण्यात आलेले गुण |
|---|---|---|---|
| 1 | तार्किक विचार (Logical Reasoning)आकृती व शब्दावर आधारित विचार | वर्गीकरण, समानता, क्रम, वेगळा घटक ओळखणे, दिशा व कालगणना, कोडिंग-डिकोडिंग, नातेसंबंध, निर्णय क्षमता, विधान-निष्कर्ष प्रकार | 20 |
| 2 | अंकगणितीय चातुर्य (Numerical Ability) | संख्याश्रेणी, प्रमाण , टक्केवारी, नफा-तोटा, व्याज (साधे व चक्रवाढ), वेळ व काम, वेळ व अंतर, क्षेत्रफळ व घनफळ, माहिती विश्लेषण | 20 |
| 3 | दृश्यकल्पना (Visual/Spatial Ability) | आकृती ओळख, पॅटर्न पूर्ण करणे, मिरर इमेज, पेपर फोल्डिंग/कटिंग, ब्लॉक्स व क्यूब्स, आकृतीतील लपलेली आकृती शोधणे | 20 |
| 4 | स्मरणशक्ती (Memory Test) | शब्द, आकृती, अंक यांचे स्मरण, जोड्या जुळवणे, अल्पकालीन व दृश्य स्मरण, | 20 |
| 5 | मानसिक व भावनिक चातुर्य (Emotional & Mental Aptitude) | भावनिक स्थैर्य, प्रेरणा, आत्मविश्वास, निर्णयक्षमता, व्यक्तिमत्व निरीक्षण, सामाजिक जाण | 20 |
| | | एकूण गुण | 100 |